दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नका

मुंबई : राज्यातील 34 जिल्ह्यांमधील 265 तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. शासनाच्या या निर्देशांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

SIR यादीवर दावे- हरकती दाखल करण्यास मुदतवाढ

मुंबई: महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाला अर्थात SIR यादीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जर नागरिकांचे प्रारूप मतदार यादीमध्ये नाव नसेल अशा नवमतदारांना आपलं नाव मतदार यादीमध्ये नोंदवण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. जरीही दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली असली तरीही मात्र अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणेच प्रसिद्ध केली जाणार आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

विवोने आपल्या एस-सिरीजमध्ये नवीन एस२ एफई सादर केला आहे

नवी दिल्ली : विवो इंडियाने आज विवो एस२ एफई स्मार्टफोन सादर करून भारतातील आपल्या एस-सिरीज पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. देशातील आधुनिक आणि नेहमी कनेक्टेड असणाऱ्या तरुणांच्या बदलत्या गरजा आणि मागण्या लक्षात घेऊन हा स्मार्टफोन डिझाइन करण्यात आला आहे. विवो एस२ एफईचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची शक्तिशाली १०,००० एमएएच बॅटरी. 'सर्वात लांब इलेक्ट्रॉनिक उत्पादन चाचणी लाइव्हस्ट्रीम'साठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित करून या बॅटरीने जागतिक स्तरावर आपली प्रभावी क्षमता सिद्ध केली आहे, ज्यामध्ये तब्बल ३२ तास आणि ३७ मिनिटांचा कालावधी नोंदवला गेला आहे. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, आधुनिक डिझाइन, आकर्षक मनोरंजन, व्यावहारिक इमेजिंग आणि सुरळीत कामगिरीसह, विवो एस२ एफई वापरकर्त्यांना पॉवर्ड, कनेक्टेड आणि प्रत्येक सामाजिक क्षणासाठी तयार ठेवण्यासाठी डिझाइन केला आहे.

अक्षय कुमार, अजय देवगण, संजय दत्त यांचा गणेश आचार्य यांच्या चित्रपटाला पाठिंबा

छत्रपती संभाजीनगर : गणेश आचार्य यांच्या आगामी 'गणेश डस्ट टू स्टारडस्ट' चित्रपटाच्या ट्रेलरला अक्षय कुमार, अजय देवगण, संजय दत्त, सनी देओल, विकी कौशल, विद्या बालन आणि फराह खान यांच्यासह अनेक बॉलिवूड कलाकारांनी पाठिंबा दिला आहे. अक्षय कुमारने मास्टरजींसोबतच्या आठवणी सांगत त्यांच्या यशस्वी प्रवासाबद्दल अभिमान व्यक्त केला. शिवांशु सोनी, आलोक शॉ, सुकन्या कलान आणि साक्षी पावस्कर यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट स्वप्ने, संघर्ष आणि दृढनिश्चयाची कहाणी मांडणार आहे. सौंदर्या आचार्य यांनी निर्मिती केलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन गणेश आचार्य यांनी केले आहे. हा चित्रपट ११ डिसेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

उत्सर्जन कमी करण्याचे उद्दिष्ट

नवी दिल्ली:अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडची उपकंपनी असलेल्या कच्छ कॉपर लिमिटेडने आपल्या कामकाजात ११५ मेगावॅट अक्षय ऊर्जेचा समावेश करण्याचे नियोजन केले आहे.गुजरातमधील मुंद्रा येथे असलेल्या तांबे शुद्धीकरण प्रकल्पातील उत्सर्जन कमी करणे, पाण्याचे संवर्धन करणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर वाढवणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कंपनी सध्या वार्षिक ५ लाख टन क्षमतेचा तांबे वितळविण्याचा प्रकल्प चालवत असून, ही क्षमता वाढवून १० लाख टन करण्याची तिची योजना आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या विस्तारामुळे हा जगातील एकाच ठिकाणी असलेला सर्वात मोठा कस्टम स्मेल्टर प्रकल्प ठरेल.आपल्या पहिल्या शाश्वतता अहवालात कच्छ कॉपरने पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि सुशासन (ईएसजी) या घटकांचा आपल्या कामकाजात समावेश करण्याची योजना मांडली आहे.


15,000 सिमेंटच्या गोण्यांमधून साकारली आई दुर्गेची प्रतिमा

नवरात्रोत्सव आणि दुर्गापूजा २०२६ च्या निमित्ताने अदाणी सिमेंटने आई दुर्गेला अनोख्या पद्धतीने अभिवादन केले आहे. अदाणी समूहाचा भाग असलेल्या आणि जगातील नवव्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या सिमेंट उत्पादक कंपनीने १५,००० सिमेंटच्या गोण्यांमधून आई दुर्गेची भव्य प्रतिमा साकारली आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबवणारी ही पहिली आणि एकमेव सिमेंट कंपनी आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे जमिनीवरून पाहिल्यास सिमेंटच्या हजारो गोण्या स्वतंत्रपणे दिसतात; मात्र कॅमेरा जसजसा आकाशाच्या दिशेने जातो, तसतसे आई दुर्गेचे भव्य स्वरूप स्पष्ट होऊ लागते.

ऐतिहासिक ठेव्याची भयंकर दुर्दशा जागतिक वारशाच्या शेजारील 'घटोत्कच लेणी' वाऱ्यावर शासनाचा नाकर्तेपणा चव्हाट्यावर

गाड्या जाण्यासाठी साधा रस्ताही नाही; पुरातत्त्व विभागाच्या डोळ्यांवर पट्टी बांधली आहे का

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी







जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांच्या वैभवावर कोट्यवधी रुपये कमावणाऱ्या आणि पर्यटनाचा दिंडोरा पिटणाऱ्या प्रशासनाचा आणखी एक भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे अजिंठा लेण्यांपासून अवघ्या १८ किलोमीटर पश्चिमेला सोयगाव तालुक्यातील जंजाळा परिसरात असलेल्या आणि वाकाटककालीन बौद्ध वास्तुकलेचा अमूल्य वारसा लाभलेल्या घटोत्कच लेण्यांकडे शासनाने आणि पुरातत्त्व विभागाने पूर्णपणे पाठ फिरवली आहे रस्ता दिशादर्शक फलक आणि सुविधांच्या अभावामुळे हा ऐतिहासिक ठेवा आता दुर्लक्षित राहिला असून, प्रशासन नेमकी कोणती झोप काढत आहे असा संतप्त सवाल इतिहासप्रेमी आणि नागरिकांकडून विचारला जात आहे

काय आहे घटोत्कच लेणीचा इतिहास : या लेण्या इ.स. पाचव्या-सहाव्या शतकातील वाकाटककालीन बौद्ध स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहेत उपलब्ध पुरातत्त्वीय नोंदींनुसार या लेणी समूहात एक चैत्यगृह आणि दोन विहारांचा समावेश आहे येथे भगवान बुद्धाची विलोभनीय प्रतिमा कोरीव खांब आणि अप्रतिम शिल्पकाम पाहायला मिळते विशेष म्हणजे अजिंठा लेणी क्रमांक १६ ची निर्मिती करणारा वाकाटक राजा हरिषेणाचा मंत्री वराहदेव याच्याशी संबंधित शिलालेखही या लेणीत आढळतो या शिलालेखात बुद्ध धम्म आणि संघाचा तसेच वराहदेवाच्या कुटुंबाचा उल्लेख असल्याचे पुरातत्त्वीय अभ्यासातून समोर आले आहे

प्रशासनाचा थर्ड क्लास कारभार : एवढा महान आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला असतानाही आज या लेण्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे पर्यटकांना तिथे जाण्यासाठी साधा गाड्यांचा मार्ग उपलब्ध नाही पायवाटही सुरक्षित नाही आणि कुठेही दिशादर्शक फलक लावलेले नाहीत पर्यटकांसाठी कसल्याही मूलभूत सुविधा येथे नाहीत अजिंठा लेणीच्या जिवावर गब्बर झालेल्या प्रशासनाला या ऐतिहासिक लेण्यांचा विकास करावासा वाटत नाही का जर या मूलभूत सुविधाच नसतील तर पर्यटक तिथे पोहोचणार कसे असे उद्विग्न सवाल आता उपस्थित होत आहेत

इतिहासप्रेमींचा संतापाचा भडका : जर प्रशासनाने या लेण्यांपर्यंत जाण्यासाठी सुरक्षित रस्ता आणि मूलभूत पर्यटन सुविधा विकसित केल्या तर या ऐतिहासिक ठेव्याला पर्यटकांच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळू शकते मात्र अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे हा खजिना दुर्लक्षित राहिला आहे पुरातत्त्व विभागाने या लेण्यांचे मूळ स्वरूप अबाधित ठेवून तातडीने शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करावे तसेच स्थानिक पातळीवर पर्यटनविषयक जनजागृती करावी अशी आक्रमक मागणी इतिहासप्रेमी आणि परिसरातील नागरिकांकडून जोर धरत आहे शासनाने तातडीने पावले न उचलल्यास हा अमूल्य वारसा काळाच्या ओघात नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे

JNUतील विद्यार्थिनींच्या कथित लैंगिक छळप्रकरणी भाजप महिला मोर्चाचे क्रांती चौकात आंदोलन

किशोर शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसविरोधात घोषणाबाजी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) : जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (JNU) ११ विद्यार्थिनींच्या कथित लैंगिक छळप्रकरणाच्या निषेधार्थ भाजप महिला मोर्चाच्या शहर व ग्रामीण शाखेच्या वतीने सोमवारी क्रांती चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाच्या विरोधात घोषणाबाजी करत या प्रकरणावर पक्षाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा तथा आमदार चित्रा वाघ यांच्या आदेशानुसार आणि भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. JNUमधील प्राध्यापक तथा काँग्रेस खासदार डॉ. अंगोमचा बिमोल अकोइजाम यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या या कथित प्रकरणावर काँग्रेस नेतृत्वाने मौन न बाळगता भूमिका स्पष्ट करावी. तसेच विद्यार्थिनींना न्याय मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

महिलांची सुरक्षा आणि विद्यार्थिनींचा सन्मान हा गंभीर विषय असून, अशा प्रकरणांमध्ये संबंधितांनी नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. महिलांवरील अन्यायाच्या घटनांविरोधात आवाज उठविण्याचा आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनाला माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, माजी आमदार संजय केणेकर, महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा डॉ. उज्ज्वला दहिफळे आणि ग्रामीण पूर्व जिल्हाध्यक्षा ऐश्वर्या गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय नगरसेविका माधुरी अदवंत, सविता कुलकर्णी, अमृता पालोदकर, डॉ. सुनीता सोळुंके, शोभा बुरांडे, सुरेखा गायकवाड, कीर्ती शिंदे, वर्षा सोळुंके, विजय भोसले, वंदना शाह, सुनीता औरादे, कविता देशमुख, मोहिनी बडे, शिल्पा सेलूकर, अपर्णा चौबे, संज्योत पाटील, भारती देशपांडे, रत्ना सोनवणे, भागूबाई काकडे आणि अर्चना गायकवाड यांच्यासह महिला मोर्चाच्या शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भाजपचे शहर सरचिटणीस हर्षवर्धन कराड, रामेश्वर भादवे, ताराचंद गायकवाड, अनुसूचित मोर्चाचे अध्यक्ष सचिन मिसाळ, पडेगाव मंडळ अध्यक्ष निलेश धारकर, येझेश बसये आणि युवा मोर्चाच्या धनश्री रोंघे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्तेही आंदोलनात सहभागी झाले होते.

वारकरी गुरुकुलातील अठरा विद्यार्थ्यांना विषबाधा

दोघे विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर परभणी येथे पाठवले



हिंदू प्रकाश वार्ता/अशोक पवार

परभणी**वारकरी गुरुकुलातील 18 विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना दिनांक 12 ऑक्टोबर सोमवार रोजी सकाळी गंगाखेड तालुक्यातील अकोली येथील भक्ती वेदांत वारकरी गुरुकुलात घडली विषबाधित विद्यार्थ्यांना उपचारासाठी गंगाखेड येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असून त्यापैकी दोन विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हरविण्यात आले आहेत. अधिक ची माहिती अशी की गंगाखेड तालुक्यातील अकोली येथील भक्ती वेदांत वारकरी पीठ गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सोमवारी सकाळी अचानक मळमळ होणे उलटी होणे व पोटात दुखणे हा त्रास सुरू झाल्याने गुरुकुलातील गुरु आकाश शास्त्री यांनी खाजगी वाहनाने प्रतीक कैलाशयादव रामेश्वर श्रीधर माने सोहम वसंत सानप विनायक भागवत शिंदे भागवत शुभम कुमार यमगर पृथ्वीराज भास्कर बिडगर गणेश बाबुराव मदने मंथन मोतीराम गुटे समर्थ रुस्तुम देवकते यश किसन माने ऋषिकेश अशोक माने अभिषेक विक्रम मुंडे रमेश केशव ढाकणे योगीराज मारुती सुरनर ईश्वर गोविंद दिघोळे जनार्धन दिगंबर पांढरे कृष्णा रंगनाथ साळवे कृष्णा बालासाहेब यमगरबा या विषबाधित विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नागनाथ नि निलंगेकर डॉक्टर पी आर चट्टे डॉक्टर मोहन मुलगीर परिचारिका पल्लवी माने अंकिता कदम अश्विनी मुंडे प्रज्ञा जोगदंड भीमा राठोड यांनी प्रथमोपचार करून प्रतीक माने व रामेश्वर यादव यांना प्रकृती गंभीर असल्यामुळे परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये हलवण्यात आले विषबाधा कशामुळे झाले त्याचे कारण अद्याप कळले नसून अधिक चौकशी चालू आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना दिलासा; डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून परीक्षा शुल्क माफ

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्णयानुसार, २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांतील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मोठा निर्णय घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे शुल्क माफ करण्यात आले असून, यासंदर्भातील तात्काळ परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जारी केले आहे.

विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक प्रा. डॉ. बाबासाहेब एन. डोळे यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये, परिसंस्था आणि स्वायत्त संस्थांमधील पात्र विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळणार आहे. या दुष्काळसदृश भागातील पात्र विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा शुल्क न घेता त्यांचे परीक्षा अर्ज साक्षांकित करून विद्यापीठाकडे पाठवावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जर विद्यार्थ्यांने आधीच परीक्षा शुल्क भरले असेल, तर अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करून प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करावी व आवश्यक निधीची मागणी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे करावी लागणार आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल आणि एकही विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. उच्च शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार ही कार्यवाही तात्काळ अमलात आणली जात असून, यामुळे दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

हिंदू प्रकाशवार्ताच्या बातमीचा इफेक्ट! अंधारीत गटारीच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी युवा नेते विठ्ठल पाटील तायडे सरसावले


अंधारीत मुख्य रस्त्यावर गटारीचे पाणी; नागरिक त्रस्त, आरोग्य धोक्यात!

हिंदू प्रकाशवार्ता | जाकेर बेग

अंधारी येथील मुख्य रस्त्यावर गटारीचे घाण पाणी वाहत असल्याने नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत हिंदू प्रकाशवार्ताने वृत्त प्रकाशित केले होते. या बातमीची दखल घेत युवा नेते विठ्ठल पाटील तायडे यांनी या समस्येच्या कामासाठी पुढाकार घेतला.

मुख्य रस्त्यावर सांडपाणी साचल्यामुळे नागरिक, वाहनधारक आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. परिसरात दुर्गंधी पसरल्याने तसेच साचलेल्या पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात होता.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत हिंदू प्रकाशवार्ताने नागरिकांच्या व्यथा प्रशासनासमोर मांडल्या. त्यानंतर युवा नेते विठ्ठल पाटील तायडे यांनी या प्रश्नावर पुढाकार घेतल्याने नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

बातमीचा इफेक्ट; नागरिकांच्या समस्येला मिळाली दिशा!

लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकारिता करत असते. अंधारी येथील गटारीच्या पाण्याचा प्रश्नही त्याचेच उदाहरण ठरत आहे. आता संबंधित प्रशासनानेही तातडीने लक्ष घालून सांडपाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

हिंदू प्रकाशवार्ता — जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारे व्यासपीठ!

"शाल जोडे"



दिलीप घुगे यांच्या प्रचारासाठी मतदारांपर्यंत पोहोचा : अंबादास दानवे

शिवसेना पदाधिकारी व लोकप्रतिनिधी मेळाव्यात बूथनिहाय नियोजनाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार दिलीप घुगे यांच्या प्रचारासाठी शिवसेना पदाधिकारी व लोकप्रतिनिधींचा मेळावा सोमवारी (१२ ऑक्टोबर) निराला बाजार येथे झाला. या मेळाव्यात शिवसेना नेते, आमदार तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पदाधिकारी व शिवसैनिकांनी मतदारांपर्यंत थेट पोहोचून निवडणुकीच्या कामाला लागावे, असे आवाहन केले.

मतदार याद्यांच्या आधारे बूथनिहाय नियोजन करून प्रत्येक मतदाराशी संपर्क साधावा. जिल्हा परिषद, पंचायत समिती, शाळा-महाविद्यालये, बँका, पतसंस्था, बाजार समित्या तसेच विविध शासकीय आणि खासगी संस्थांमधील मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर द्यावा. संघटनात्मक ताकदीच्या जोरावर सर्व पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी परिश्रम घेऊन दिलीप घुगे यांच्या प्रचारासाठी काम करावे, असे दानवे यांनी सांगितले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला विजयी करण्यासाठी सर्वांनी सक्रिय व्हावे. जिल्ह्यातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, महिला आघाडी आणि शिवसैनिकांनी समन्वयाने काम करून निवडणुकीत पक्षाच्या यशासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन खैरे यांनी केले.

शिवसेना पक्षाने आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर सोपवलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. पदाधिकारी आणि शिवसैनिकांच्या साथीने निवडणुकीला सामोरे जात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सीमोल्लंघन करून शिवसेनेचा विजय खेचून आणण्याचा संकल्प आहे, असा विश्वास उमेदवार दिलीप घुगे यांनी व्यक्त केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

पेटकेअर क्षेत्रात रोजगाराची नवी दिशा आणि संवेदनशीलतेची जोड

बदलत्या जीवनशैलीमध्ये पाळीव प्राणी (Pets) हे आज केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, अनेक कुटुंबांचा एक अविभाज्य आणि आपुलकीचा भाग बनले आहेत. अशा वेळी, पाळीव प्राण्यांची योग्य काळजी, आरोग्य, स्वच्छता आणि संगोपनासाठी शास्त्रीय ज्ञान असलेल्या प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज मोठ्या प्रमाणावर भासत आहे. या पार्श्वभूमीवर, पुण्याच्या धर्तीवर मुंबईतही 'पेटकेअर शिक्षण व प्रशिक्षण संस्था' सुरू करण्याची आणि राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) याविषयक विशेष अभ्यासक्रम समाविष्ट करण्याची कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केलेली घोषणा अत्यंत दूरदृष्टीची, काळाची गरज ओळखणारी आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणारी आहे. आजवर आपल्याकडे पाळीव प्राण्यांचे संगोपन, ग्रूमिंग, त्यांना फिरायला नेणे किंवा त्यांच्या निवासाची व्यवस्था करणे ही कामे बहुतांश अनौपचारिक किंवा अनुभवाच्या आधारावर केली जात होती. मात्र, प्राण्यांना हाताळताना आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेताना शास्त्रीय व नैतिक पद्धतींचा (Ethical Practices) वापर होणे अत्यंत गरजेचे असते. आयटीआयसारख्या शासनमान्य संस्थांच्या माध्यमातून पेट ग्रूमिंग, पेट वॉकिंग आणि निवास व्यवस्थापनाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध झाल्याने, या क्षेत्राला एक अधिकृत व्यावसायिक स्वरूप प्राप्त होईल. यामुळे प्राणीप्रेमी तरुणांना आणि या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या युवकांना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतील. मुंबईत ही संस्था स्थापन करताना केवळ प्रशासकीय पातळीवर निर्णय न घेता, नागरिक आणि प्राणीप्रेमींकडून 'गुगल फॉर्म'द्वारे सूचना व हरकती मागवून लोकसहभागावर भर देणे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. प्रात्यक्षिक शिक्षणावर दिलेला भर आणि पाळीव प्राण्यांच्या पालकांसाठी (Pet Parents) ऑनलाइन अभ्यासक्रमांची आखणी यामुळे समाजात मुक्या प्राण्यांप्रती जागरूकता आणि संवेदनशीलता वाढण्यास मदत होईल. हा उपक्रम केवळ मुंबई किंवा पुण्यापुरता मर्यादित न राहता, संपूर्ण राज्यभरात प्रभावीपणे राबवला गेल्यास, रोजगाराच्या संधींसोबतच पशुपालनाचा आणि प्राण्यांच्या कल्याणाचा एक नवा आदर्श महाराष्ट्रात उभा राहील, यात शंका नाही.

संविधान हातात घेऊन काँग्रेसचा संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : संविधानाची प्रत हातात घेऊन त्याच संविधानाने निर्माण केलेल्या संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचे काम काँग्रेसकडून सुरू आहे. निवडणूक आयोग, रिझर्व्ह बँक आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांसारख्या संस्थांबद्दल जनतेच्या मनात अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दिल्ली आणि मुंबईत सुरू असलेली आंदोलने हा विरोधकांकडून खोटे कथानक पसरविण्याचा प्रयत्न असून, सर्वोच्च न्यायालयावरही दबाव आणला जात असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला.

दिल्लीमध्ये राहुल गांधी यांच्यासह इंडी आघाडीचे नेते रस्त्यावर उतरले आहेत, तर मुंबईत ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन सुरू आहे. या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी काँग्रेस आणि विरोधकांवर टीका केली. भारताचे संविधान नाकारून देशात अति डावी सत्ता प्रस्थापित करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सर्वोच्च न्यायालय हे सत्तेच्या इतर अंगांपासून स्वतंत्र असून, सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार त्याचे कामकाज चालते. न्यायालयाला कोणत्याही मोर्चाला सामोरे जाणे किंवा आंदोलनकर्त्यांशी चर्चा करणे बंधनकारक नाही. न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी घेणे, हा त्याचा अधिकार आहे. असे असताना सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे फडणवीस म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी इतर न्यायाधीशांशी चर्चा करून आंदोलनकर्त्यांना भेटता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. याचिका दाखल केल्यास त्यावर सुनावणी घेता येईल, अशी भूमिका न्यायालयाने मांडली आहे. असे असतानाही समाजमाध्यमांवर सरन्यायाधीशांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरली जात आहे. हा सर्वोच्च न्यायालयाला कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याची टीका फडणवीस यांनी केली. संविधानाचे समर्थक म्हणविणाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी मोर्चाला सामोरे जाणे हे संविधानाला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आहे का, याचे उत्तर द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

१९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी संविधानात दुरुस्त्या करून मूलभूत अधिकार नाकारले आणि त्याविरोधात न्यायालयात जाण्याचा मार्गही बंद केला होता, असा दाखला फडणवीस यांनी दिला. त्या वेळी संघर्ष करून संविधानाचे पुनर्स्थापन करण्यात आले, असे ते म्हणाले. संविधानाची प्रत हातात घेऊन आंदोलने केली, तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाला हात लावू देणार नाही, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.

जंतरमंतर येथे आंदोलन सुरू असताना समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात विविध पोस्ट प्रसारित केल्या जात होत्या. यासंदर्भात संसदीय समितीने काही समाजमाध्यम मंचांना बोलावून चौकशी केली होती. पोस्ट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पैसे मिळत असल्याचे या मंचांनी मान्य केले होते. हा पैसा परदेशातून आलेला असू शकतो, असेही त्यांनी मान्य केल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

आंदोलन 'मॅन्युफॅक्चर्ड' असल्याचा आरोप

काँग्रेसला सातत्याने निवडणुकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागत असून, भविष्यातही विजयाची शक्यता कमी असल्याने पक्ष धास्तावला आहे. अनेक राज्यांमध्ये काँग्रेसची राजकीय प्रासंगिकता कमी झाली असून, कोणत्याही मार्गाने सत्तेत येण्याचा पक्षाचा प्रयत्न सुरू आहे, अशी टीका फडणवीस यांनी केली. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आंदोलनासाठी लोकांना कशा प्रकारे जमविले जात आहे, हे समोर आणले आहे. त्यामुळे हे आंदोलन नैसर्गिक नसून नियोजनपूर्वक उभे करण्यात आलेले आहे, असा दावा फडणवीस यांनी केला.

साई संस्थानच्या 488 कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेत कायम होण्याचा मार्ग मोकळा

मंत्री विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्याने 488 कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा मार्ग मोकळा

शिर्डी (प्रतिनिधी) श्री साईबाबा संस्थानमधील ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीच्या प्रश्नाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले असून, छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांच्या सेवेत कायम होण्याच्या प्रक्रियेतील कायदेशीर अडथळे दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सेवेत कायम होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

श्री साईबाबा संस्थानमध्ये अनेक वर्षांपासून शेकडो कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा विषय यापूर्वीच धोरणात्मक स्तरावर विचाराधीन होता. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय, आर्थिक आणि कायदेशीर बाबींमुळे हा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेत गेला होता. संस्थानच्या वतीने यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती.

कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चांमधून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच, न्यायालयीन प्रक्रियेत कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक भूमिका मांडली जावी, यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

दरम्यान, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनीही या प्रश्नाकडे लक्ष देत कर्मचारी संघटना, संस्थान प्रशासन आणि संबंधित शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकांमध्ये सहभागी होत, त्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी विखे पाटील पिता-पुत्रांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीसंदर्भातील पुढील प्रक्रिया मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सेवेत कायम होण्याबरोबरच नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा आणि लाभ मिळण्याच्या दृष्टीनेही या निर्णयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, सेवाकायमीची प्रत्यक्ष अंमलबजावणी न्यायालयाच्या आदेशातील अटी आणि संस्थान प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीवर अवलंबून राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उत्तुंग कारकीर्द आणि राष्ट्रनिष्ठेचा सेवा संकल्प !

७ ऑक्टोबर २०२६ हा नरेंद्रजी मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. दिनांक ७ ऑक्टोबर २००१ रोजी त्यांनी प्रथमच गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. त्यामुळे ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या निवडून आलेल्या कार्यकारी राजकीय पदावरील सलग २५ वर्षे पूर्ण होत आहेत. ही संपूर्ण कारकीर्द देशासाठी अत्यंत गौरवपूर्ण असून एका अद्वितीय अशा प्रगल्भ नेतृत्वाच्या या कारकिर्दीच्या निमित्ताने सेवा संकल्प अभियान राबवण्यात आले आहे. दिनांक१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर असे महिनाभराचे अभियान सुरू केले आहे. १७ सप्टेंबर हा मोदींचा वाढदिवस 'सेवा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला, तर ७ ऑक्टोबर हा अभियानातील विशेष दिवस ठेवण्यात आला आहे. देशाच्या सर्व समाज घटकात अत्यंत लोकप्रिय आणि राष्ट्रनिष्ठेचा उत्तुंग अविष्कार असणाऱ्या आपल्या पंतप्रधानांची कारकीर्द ही सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी आहे. यानिमित्ताने त्यांच्या एकूणच कार्यकर्तृत्वाला उजाळा देणे आवश्यक वाटते. ७ ऑक्टोबर २०२६ हा 'मोदीजींच्या सलग २५ वर्षांच्या सार्वजनिक/शासकीय नेतृत्वाचा टप्पा' म्हणून महत्त्वाचा असल्यानेच याला 'सेवा संकल्प' आणि 'विकसित भारत' या राजकीय संदेशाशी जोडले आहे.

....याच वर्षी म्हणजे दिनांक २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला एक तप पूर्ण झाले.२६ मे २०१४ रोजी त्यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. तेव्हा अर्थातच देशातल्या सर्व जनतेला अतीव आनंद झाला. आपल्या स्वप्नांना हेच नेतृत्व समर्थ आकार देऊ शकते ही प्रत्येक जनतेच्या अंतःकरणातली भावना होती. पुढच्या कारकिर्दीत ती अतिशय सार्थ ठरली.२०१९ व २०२४ यावेळी त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारून हॅट्रिक साधली. त्यांच्या नेतृत्वाखाली सलग तीन वेळा जे सरकार देशात स्थापन झाले त्यानंतर देशवासीयांच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली. देशात यापूर्वी आदरणीय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय जनता पक्षाचे पहिले पंतप्रधान झाले. पहिल्यावेळी त्यांना केवळ तेरा दिवस तर दुसऱ्यांदा १३ महिने अशी संधी मिळाली. त्यानंतर एकवेळ पूर्ण कार्यकाळ मिळाला. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सलग तीन वेळा संधी मिळाल्याने प्रखर अशी राष्ट्रनिष्ठा, देशाबद्दलची कळकळ, निर्णय व धोरणे घेतानाचा ठामपणा, राष्ट्रहितासाठी आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला समूळ नष्ट करण्याची जिद्द, राष्ट्राच्या उद्धारासाठी त्यांचे प्रत्येक पाऊल देशवासियांना मोलाचे वाटले. आदरणीय मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल अत्यंत प्रगल्भपणे सुरू आहे याविषयी जनतेच्या मनात कोणतीही शंका नाही. किंबहुना या नेतृत्वामुळे आज भारताला पुन्हा प्रतिष्ठा मिळाली आहे. जगाच्या नकाशावर भारत एक समर्थ राष्ट्र म्हणून उदयाला आले आहे असेच प्रत्येक भारतीयाला वाटते. सलग तीन वेळा पंतप्रधानपदी विराजमान होऊन भारताला जगाच्या नकाशावर अभिमानाने वलय प्राप्त करून देणाऱ्या मोदीजींनी सर्वाधिक दिवस पंतप्रधानाचा आधीचा विक्रम मोडीत काढला आहे. हे त्यांचे कर्तृत्व संपूर्ण देशासाठी एक अभिमान बिंदू आहे.

देशात भारतीय जनता पक्षाची घोडदौड सुरू आहे. जनतेच्या मनात आज भाजपविषयी सर्व विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. त्यात आदरणीय मोदीजींचा सिंहाचा वाटा आहे. आज देशात २२ राज्यात एनडीएचे सरकार आहे. १७ मुख्यमंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. सबंध देशावर भारतीय जनता पक्षाचा जो प्रभाव आहे याला कारण मोदीजींचे करिष्मा असलेले नेतृत्व आहे. अर्थात हे केवळ भारतापुरते मर्यादित नाही तर या नेतृत्वाचा दबदबा जगभर आहे हे विरोधकांनाही मान्यच करावे लागेल. त्यासाठी अगदी अलीकडचीच दोन उदाहरणे द्यायची झाली तर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपले चांगले मित्र आहेत आणि भारत- अमेरिका यांच्यात व्यापार करार निश्चितपणे होईल असा ठाम विश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. त्याचवेळी अलीकडेच आलेल्या एका सर्वेक्षणानुसार भारताची अर्थव्यवस्था दिवसेंदिवस मजबूत होत असून चौथ्या तिमाहीत जीडीपी ७.८ टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. युद्धसदृश्य परिस्थितीमुळे जगातल्या अनेक अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत आहेत असे असताना भारताच्या अर्थव्यवस्थेने अपेक्षेपेक्षा अत्यंत चांगली कामगिरी केली आहे. कृषी क्षेत्रात लक्षणीय प्रगती, बांधकाम क्षेत्रातील वाढ, खाजगी गुंतवणूक या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून आपली अर्थव्यवस्था अत्यंत बळकट झाली आहे. अनेक देशांमध्ये अस्थिरता असताना भारताची मात्र वेगाने प्रगती सुरू आहे. 'मोदी है तो मुमकीन है' ही केवळ आकर्षक घोषणा नाही तर देशवासीयांच्या मनातला प्रचंड असा विश्वास आहे.

आदरणीय मोदीजींची कारकीर्द प्रत्येक देशवासियाला आपली वाटते याची काही कारणे आहेत. अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदिर व्हावे यासाठी अनेकांनी आपले प्राण दिले. 'श्रीराम' हा प्रत्येक भारतीयाच्या अंत:करणातला परम आदरणीय असा उद्गार आहे. प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा प्रश्न अनेक वर्षे रेंगाळला. भव्य मंदिराचे लोकार्पण झाले, तो क्षण देशवासीय कधीच विसरू शकत नाही. त्या दिवशी प्रत्येक भारतीयाच्या मनात आनंदाच्या लाटा निर्माण झाल्या. सबंध देशाला एका सूत्रात गोवणारे दैवत म्हणून प्रभू श्रीरामाचे प्रत्येकाच्या अंत:करणात स्थान आहे. मोदीजींनी जेव्हा मंदिराचे लोकार्पण करून ऐतिहासिक कर्तृत्व सिद्ध केले तेव्हा प्रत्येक भारतीय माणूस आनंदित झाला. अयोध्येतील राम मंदिराचे निर्माण ही प्रत्येक भारतीयाच्या मनातली पूर्ण झालेली आकांक्षा आहे. कश्मीरसाठी असलेले ३७० कलम, तीन तलाख रद्द करणे ही बाब सुद्धा संपूर्ण देशवासीयांना अभिमानास्पद वाटली आहे. असे निर्णय घेण्यासाठी प्रखर देशभक्ती असावी लागते. जे अडथळे येतील त्या सर्व अडथळ्यांना पुरून उरण्याची जिद्द असावी लागते. त्यासाठी कर्तव्यकठोर असणे गरजेचे आहे. मोदीजींच्या नेतृत्वात हे सर्व गुण आहेत. भारताची अस्मिता जोपासतानाच जगात भारताचा कणा ताठ ठेवण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे यावर देशातल्या सर्वच नागरिकांचा ठाम विश्वास आहे. मोदीजींनी या देशाची सूत्रे हाती घेतली तेव्हा भारत अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जगात अकराव्या क्रमांकावर होता तो आता चौथ्या क्रमांकावर आला आहे. यापुढेही भारताची विजयीगाथा सुरूच राहील.

जे विषय राष्ट्राच्या अस्मितेचे, अभिमानाचे आहेत त्याबाबत कोणतीही तडजोड करायची नाही असा ठाम निर्धार मोदीजींच्या नेतृत्वातून व्यक्त होतो. त्याचवेळी समाजातल्या गोरगरीब, उपेक्षित, वंचित घटकांची त्यांनी सतत काळजी घेतलेली आहे ही बाब देशवासीयांच्या समोर आहे. ८१ कोटी लोकांना दरमहा पाच किलो धान्य मोफत देण्याचा निर्णय असो अथवा २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचा निर्णय असो या सर्वच बाबी मोदीजींचे समाजातल्या गरीब घटकांविषयी किती जिव्हाळ्याचे धोरण आहे हे सिद्ध करणाऱ्या आहेत.

देशातल्या गोरगरीब महिलांसाठी इंधनाची समस्या जीवघेणी आहे. त्याचा थेट महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून आज देशातल्या कोट्यावधी महिला गॅसचा लाभ घेत आहेत. आजवरच्या कोणत्याही सरकारला हे सुचले नाही. ज्या घरात धुराचे लोट होते आणि केवळ घरच नव्हे तर महिलांचे आरोग्य काळवंडले होते अशा ठिकाणी त्यांना मुक्त श्वास आणि आरोग्य या दोन्ही गोष्टी उज्वला गॅस योजनेच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या. प्रधानमंत्री आवास योजना, जनधन योजना या योजनेतून देशातल्या वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. ज्या जनतेच्या डोक्यावर हक्काचे छप्पर नाही अशा कोट्यावधी कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून हक्काचे घर मिळाले. समाजातल्या वंचित घटकांमध्ये आर्थिक परिवर्तन आणण्याच्या दृष्टिकोनातून हे सर्वच निर्णय अत्यंत महत्त्वाचे ठरले.

सामान्य कुटुंबापासून ते देशाच्या सर्वोच्च राजकीय पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा आधुनिक भारतातील लोकशाहीच्या सामर्थ्याचा एक प्रेरणादायी अध्याय आहे. त्यांचे नेतृत्व हे घराणेशाहीतून आलेले नाही तर प्रचंड अशा संघर्षातून सिद्ध झालेले आहे. २०१४ मध्ये भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी "नवभारत" घडविण्याचा संकल्प मांडला. व त्यांच्या नेतृत्वाखाली देशात अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात आल्या. जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत यांसारख्या उपक्रमांनी शासनाचा लाभ समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रातही मोदी यांनी भारताची प्रतिमा उंचावली आहे. जगातील प्रमुख राष्ट्रांशी त्यांनी संबंध अधिक दृढ केले. विविध आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताची भूमिका प्रभावीपणे मांडली. जागतिक राजकारणात भारताचा वाढता प्रभाव आणि भारताविषयी निर्माण झालेला विश्वास हे त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वपूर्ण यश मानले जाते. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांच्या नेतृत्वाची मोठी परीक्षा झाली. या संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन, आरोग्य यंत्रणा आणि वैज्ञानिक समुदाय यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून मोठ्या लोकसंख्येपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात आल्या हे त्यांचे ऐतिहासिक कार्य आहे. जनसंपर्क कौशल्य, निर्णयक्षमता, कार्यनिष्ठा, विकासाची दृष्टी आणि राष्ट्रहिताची भूमिका यांमुळे ते आजवरच्या नेतृत्वात सर्वार्थाने सक्षम आणि प्रभावी ठरतात. हे निर्विवाद सत्य आहे.

शेतकरी हा या देशातला अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरमहा पेन्शन दिली जाते. अनेक कोरडवाहू,अल्पभूधारक आणि गरीब शेतकऱ्यांना हे हक्काचे पैसे दर महिन्याला त्यांच्या खात्यात जमा होतात. ग्रामीण भागात वयोवृद्धांची समस्या बिकट आहे. अशा परिस्थितीत हा पैसा लोकांच्या आरोग्याला कामी येतो. ज्येष्ठ नागरिकांना कोणासमोरही हात पसरण्याची पाळी येत नाही. परिणामी वृद्धांना अतिशय सन्मानाचे जीवन प्राप्त झाले. आजवरच्या कोणत्याही सरकारला हे सुचले नाही. मोदीजींची लोकप्रियता समाजातल्या सर्वच घटकात आहे याची ही अनेक कारणे आहेत. वयोवृद्ध नागरिक, महिला, युवक, समाजातले सर्व वंचित घटक, सामाजिक दृष्ट्या मागास असलेले वर्ग या सर्वांच्याच मनात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल प्रगाढ असा विश्वास आहे.

देशात सुरू असलेली आर्थिक प्रगती, लोककल्याणाचे असंख्य निर्णय, दहशतवादाला मिळालेली जबरदस्त चपराक अशा अनेक बाबी मोदींच्या नेतृत्वाला प्रकाशमान करणाऱ्या आहेत. एकेकाळी जम्मू काश्मीर ही या देशाची भळभळती जखम होती. या ठिकाणच्या दहशतवादाने एवढे रक्तरंजित वातावरण निर्माण केले होते की जनतेला भयाच्या सावटाखाली वावरावे लागत होते. निरपराध नागरिकांनी दहशतवाद्यांच्या कारवायांची किंमत मोजली. आदरणीय मोदीजींच्या दमदार आणि खंबीर नेतृत्वाने मात्र दहशतवादाचा पूर्णपणे बिमोड करण्याचे काम केले. दहशतवाद्यांचे अड्डे खणून काढल्याने कोणीही भारताकडे वाकड्या नजरेने पाहू शकत नाही असा ठाम विश्वास आज प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनात आहे. याच पद्धतीने नक्षलवादाच्या भस्मासुरालाही मोदीजींच्याच काळात धडा शिकवण्यात आला. दहशतवाद आणि नक्षलवाद या दोन्ही अपप्रवृत्तींना ठेचून काढण्याचे काम त्यांच्या कार्यकाळात झाले. देशातील सर्वोच्च नेते म्हणून प्रत्येकाच्या मनात त्यांचे अढळ असे स्थान आहे.

देशाचे सर्वोच्च नेते आहेत याचे कारण जनतेच्या मनावर त्यांचा करिष्मा आहे, त्यांची पंतप्रधानपदाची तपपूर्ती हे भारतीय राजकारणातले एक सोनेरी पान आहे. त्याचबरोबर आजवरच्या सर्व पंतप्रधानांच्या कार्यकाळाचा विक्रम मोडणारी त्यांची कारकीर्द ही सबंध देशासाठी सर्वोच्च अभिमानबिंदू आहे.

नव्या संसद भवनाने भारताच्या लोकशाहीला आधुनिक वास्तुरूपाची नवी ओळख दिली आहे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम या वास्तूत दिसतो.लोकसभा आणि राज्यसभेची प्रशस्त सभागृहे, आधुनिक सुविधा आणि भारतीय कलाशैली हे तिचे वैशिष्ट्य आहे. नव्या संसद भवनाची वास्तू नव्या भारताच्या आत्मविश्वासाचे आणि लोकशाहीच्या सातत्याचे प्रतीक ठरली आहे.

सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि ऑपरेशन सिंदूरमधून भारताची दहशतवादाविरोधातील ठाम भूमिका अधोरेखित झाली.या कारवायांनी भारताची सैन्यशक्ती, गुप्तचर क्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव दाखवून दिला.सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांना उत्तर देण्याची भारताची क्षमता आणि राजकीय इच्छाशक्ती स्पष्ट झाली. या घटनांनी देशाच्या सुरक्षा धोरणात 'प्रतिबंध, प्रत्युत्तर आणि स्वसंरक्षण' यांना अधिक ठळक स्थान मिळाल्याचे दाखवून दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २०२६ पर्यंत ३६ देशांकडून आंतरराष्ट्रीय/राज्यस्तरीय सन्मान मिळाले आहेत, अशी अलीकडील नोंद आहे. फ्रान्स, रशिया, इजिप्त, भूतान, यूएई यांसह अनेक देशांनी त्यांना आपले सर्वोच्च किंवा अत्यंत प्रतिष्ठेचे सन्मान दिले आहेत. हे सन्मान त्यांच्या परराष्ट्र धोरणातील सक्रियतेचे आणि भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रभावाचे प्रतीक म्हणून मांडता येतात.त्यामुळे मोदींच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीतील एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे देशांतर्गत कामगिरीसोबतच जगभरातून मिळालेला व्यापक राजनैतिक गौरव होय.

G20च्या भारताच्या अध्यक्षतेत आणि नवी दिल्लीतील शिखर परिषदेत भारताने विकसित व विकसनशील देशांमधील संवादासाठी प्रभावी व्यासपीठ उभे केले. अफ्रिकन युनियनचा G20मध्ये समावेश करून भारताने जागतिक दक्षिणेच्या प्रतिनिधित्वाला नवी दिशा दिली. BRICSच्या माध्यमातून भारताने बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेत विकसनशील देशांचा आवाज अधिक ठळक करण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही बहुपक्षीय मंचांवरील सक्रिय नेतृत्वामुळे नरेंद्र मोदी यांची संवादक, समन्वयक आणि भारताचा प्रभाव वाढविणारा नेता अशी आंतरराष्ट्रीय प्रतिमा दृढ झाली. त्यातून भारताचे वाढते राजनैतिक वजन, 'ग्लोबल साउथ'शी असलेले संबंध आणि जागतिक निर्णयप्रक्रियेत भारताची महत्त्वाची भूमिका अधोरेखित झाली.

चांद्रयान-३च्या यशामुळे भारताच्या अंतराळ संशोधनाची क्षमता जगासमोर प्रभावीपणे अधोरेखित झाली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ISROला सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ, संसाधने आणि संस्थात्मक प्रोत्साहन दिले.२३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ यशस्वी सॉफ्ट लँडिंग करणारा भारत जगातील पहिला देश ठरला. या स्थळाला शिवशक्ती पॉईंट असे नामकरण केले.या मोहिमेने स्वदेशी तंत्रज्ञान, वैज्ञानिक आत्मविश्वास आणि अत्यल्प खर्चात अत्यंत गुंतागुंतीची अंतराळमोहीम पूर्ण करण्याची भारताची क्षमता सिद्ध केली.

गेल्या पंचवीस वर्षांच्या मुख्यमंत्री व पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत विरोधकांनी कितीही निरर्थक टीका केली आणि मोदीजींच्या प्रतिमेवर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला तरीही त्यांच्या प्रतिमेवर त्याचा तसूभरही परिणाम झाला नाही. त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे आणि आज ते देशाचे सर्वोच्च नेते आहेत याचे कारण जनतेच्या मनावर त्यांचा करिष्मा आहे, त्यांची पंतप्रधानपदाची तपपूर्ती हे भारतीय राजकारणातले एक सोनेरी पान आहे. त्याचबरोबर आजवरच्या सर्व पंतप्रधानांच्या कार्यकाळाचा विक्रम मोडणारी त्यांची कारकीर्द ही सबंध देशासाठी सर्वोच्च अभिमानबिंदू आहे. अशा या उत्तुंग नेतृत्वाच्या पाठीशी देशातल्या प्रत्येक नागरिकांनी राहणे हाच खरा 'सेवा संकल्प' होय.

- रामकिशन रौंदळे.
- प्रदेश कार्यकारणी सदस्य
- 9422176876

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

जिल्हा रुग्णालयात मानसिक आरोग्याबाबत जनजागृती कार्यक्रम; तज्ज्ञांचे मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : मानसिक स्वास्थ्य हा शारीरिक आणि भावनिक आरोग्याचा पाया आहे. त्यामुळे मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे, मानसिक आजारांबद्दलचे गैरसमज व सामाजिक कलंक दूर करणे आणि गरजूंना वेळेत उपचार घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे, असा संदेश जिल्हा रुग्णालयात आयोजित मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमातून तज्ज्ञांनी दिला.

कार्यक्रमाला जिल्हा न्यायाधीश भूषण काळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विश्वजित पवार, वैद्यकीय अधीक्षक तथा अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सारिका बडे, मानसिक आरोग्य विभागप्रमुख व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेश नरवाडे आणि डॉ. गोविंद यादव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. मानसिक आजारांबाबतचा सामाजिक कलंक दूर करून गरजू व्यक्तींना मदत मिळवून देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्य हा देखील न्याय आणि मानवी सन्मानाचा महत्त्वाचा भाग असल्याचे जिल्हा न्यायाधीश भूषण काळे सांगितले.



शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे. मानसिक आजारांचे वेळीच निदान करून योग्य उपचार घेतल्यास रुग्णाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, असे अधिष्ठाता डॉ. विश्वजित पवार यांनी नमूद केले.

ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमित योगाभ्यास, ध्यान, पुरेशी झोप आणि श्वसनाच्या तंत्रांचा अवलंब करावा. ताण कमी करण्यासाठी श्वसन तंत्राचा सराव, नियमित व्यायाम आणि मनमोकळा संवाद उपयुक्त ठरू शकतो, असे डॉ. सारिका बडे यांनी सांगितले.

मानसिक आजारांची लक्षणे ओळखून तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेश नरवाडे आणि डॉ. गोविंद यादव यांनी नैराश्य, चिंता विकार, बायपोलर डिसऑर्डर, स्किझोफ्रेनिया, ओसीडी आणि पीटीएसडी यांसारख्या मानसिक आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन केले. मानसिक आजारांची लक्षणे दिसल्यास लाज न बाळगता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. योग्य निदान, उपचार आणि नियमित पाठपुराव्यामुळे अनेक मानसिक आजार प्रभावीपणे नियंत्रित करता येतात आणि रुग्णाच्या आरोग्यात सुधारणा होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

सतत उदास वाटणे, झोपेच्या समस्या, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव किंवा मित्र-परिवारापासून दूर राहण्याची प्रवृत्ती अशी लक्षणे दीर्घकाळ जाणवत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. वेळेत तज्ज्ञांची मदत घेणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मानसिक स्वास्थ्य उत्तम राखण्यासाठी दररोज सात ते आठ तास झोप घेणे, नियमित व्यायाम करणे, मोबाइल व स्क्रीनचा वापर मर्यादित ठेवणे, योग-ध्यानाचा सराव करणे आणि कुटुंबीय व मित्रांशी मनमोकळा संवाद साधणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले. मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता पांडुरंग आवचार यांनी मानसिक आरोग्य जपण्याचे आणि गरज पडल्यास मदत घेण्याचे आवाहन केले.

टेलिमानस हेल्पलाइनद्वारे मोफत मार्गदर्शन

मानसिक आरोग्यविषयक समस्या, ताणतणाव किंवा भावनिक अडचणी जाणवत असल्यास टेलिमानसच्या १४४१६ किंवा १८००-८९१-४४१६ या टोल फ्री क्रमांकांवर २४ तास संपर्क साधून मोफत मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन व मार्गदर्शन घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाला डॉ. तारेक अन्सारी, रुग्णालयीन चिकित्सक सुभाष देवरे व प्रशांत पतंगे, औषधनिर्माण अधिकारी अनिल कदम, मनोविकारतज्ज्ञ परिचारक त्रिनेत्र स्वामी व दीपली जाधव, मनोविकृती सामाजिक कार्यकर्ते भास्कर काऊतकर व पांडुरंग आवचार, समुपदेशक विष्णू राठोड व वैशाली सोनाळे तसेच केस रजिस्टर हारून रशीद खान उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि नागरिकांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता पांडुरंग आवचार यांनी केले, तर भास्कर काऊतकर यांनी आभार मानले.

शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते फटाका मार्केटचे स्तंभपूजन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : न्यू जय महाराष्ट्र फटाका असोसिएशनतर्फे दरवर्षी अयोध्यानगरी, रेल्वेस्टेशन परिसरात फटाका मार्केट उभारण्यात येते. यंदाच्या फटाका मार्केटचे स्तंभपूजन शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी न्यू जय महाराष्ट्र फटाका असोसिएशनचे अध्यक्ष गोपाळ कुलकर्णी, उपाध्यक्ष संजय बारवाल, कोषाध्यक्ष विनायक पिंपळखेडकर, सचिव सोमनाथ माळकरी, तसेच सदस्य कमलकिशोर बासनीवाल, राजेश पाटील, सागर वाघचौरे आदी उपस्थित होते.

नगरसेवक अपात्रता प्रकरणी सुनावणी; पुढील तारीख 16 नोव्हेंबरला

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या निवडणूक विभागामार्फत नगरसेवकांच्या सदस्यत्व अपात्रतेसंदर्भात सोमवारी (१२ ऑक्टोबर) सुनावणी घेण्यात आली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०(१) व १०(१-ड) नुसार दाखल प्रकरणांवर ही सुनावणी झाली. या प्रकरणांची पुढील सुनावणी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे.

महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या सुनावणीच्या यादीत एकूण आठ प्रकरणांचा समावेश होता. यामध्ये अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम तसेच दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याच्या कारणावरून दाखल करण्यात आलेल्या अपात्रतेसंदर्भातील प्रकरणांचा समावेश आहे. सुनावणीच्या यादीत नगरसेवक फराजाना शेख गुलाम रसूल, मुन्शी भिकन शेख, पठाण मझहर पठाण अय्युब, स्वामी विश्वनाथ गुरुलिंग, अली मिर वाजिद, अशोक रंगनाथ हिरवाळे आणि अब्दुल समीर साजिद यांच्यासह संबंधित प्रकरणांतील तक्रारदारांची नावे नमूद करण्यात आली होती.

'आमच्या भागात राहायला का आलात?' म्हणत तरुणावर चाकूहल्ला; दोघांविरुद्ध गुन्हा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर

घरातील सामान नव्या घरात हलविण्याचे काम सुरू असतानाच परिसरात राहण्याच्या कारणावरून वाद उफाळला. या वादाचे रूपांतर थेट चाकूहल्ल्यात झाले. दोघांनी केलेल्या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला. रमाईनगर-एकतानगर परिसरात शनिवारी रात्री ही घटना घडली. कुणाल सातदीवे (वय ४०, रा. विनायक पार्क, देवळाई, बीड बायपास) यांच्या फिर्यादीनुसार, त्यांचा भाऊ कुंदन सातदीवे हा बहीण दीपली हिच्या घरातील सामान हलविण्यासाठी रमाईनगर-एकतानगर परिसरात गेला होता. आयशर ट्रकमधून घरगुती सामान उतरवून ते नवीन घरात हलविण्याचे काम सुरू होते. त्याचवेळी हितेंद्र वाघमारे आणि महेंद्र वाघमारे या दोघांनी तेथे येत, 'तुम्ही आमच्या भागात राहण्यासाठी का आले?' असा सवाल करत वाद घातला.

वाद वाढताच आरोपी क्रमांक एक असलेल्या हितेंद्र वाघमारे याने हातातील चाकूने कुंदन सातदीवे यांच्या पाठीवर, बरगडीच्या भागात जिवे मारण्याच्या उद्देशाने दोन वार केले. या हल्ल्यात कुंदन गंभीर जखमी झाले. अचानक झालेल्या चाकूहल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली.

या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक नुसार हितेंद्र वाघमारे आणि महेंद्र वाघमारे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ११५(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षकांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक थोटे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या 'संवाद' योजनेंतर्गत अनुसूचित जमाती, आदिवासी तसेच विमुक्त व भटक्या जमातींसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सन २०२६ च्या कार्यक्रमानुसार, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या 'संवाद (SAM-VAD)' योजनेंतर्गत अनुसूचित जमाती, आदिवासी तसेच विमुक्त व भटक्या जमातींच्या नागरिकांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळमनुरी येथे करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी श्री. आर. एम. सादरानी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण भूषण एम. काळे हे उपस्थित होते. त्यांनी वस्तीगृहातील मुलांना व मुलींना मार्गदर्शन करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी या कार्यालयामार्फत मोफत विधीज्ञ, मोफत सल्ला तसेच इतर सर्व बाबीबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच पॉक्सो ऍक्ट बाबत मार्गदर्शन केले. तसेच संवाद या योजनेबद्दल सविस्तर माहिती सांगितली. आपले नातेवाईक व इतर परिचितांना कायदेविषयक कोणतीही अडचण असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती ,कळमनुरी या कार्यालयाशी संपर्क साधावा असे त्यांनी आवाहन केले. तसेच टोल फ्री नंबर 15 100 याबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे उपस्थित विद्यार्थ्यांना लॉ च्या करिअर संबंधी मार्गदर्शन करून त्यामध्ये नोकरीच्या किती संधी आहेत ते सविस्तर सांगितले

सदर कार्यक्रमासाठी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रमेश भडके, मुलांच्या वस्तीगृहाचे गृहपाल श्री. शिंदे, मुलींच्या वस्तीगृहाच्या गृहपाल शेख मॅडम, तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम; शिवना येथील शिवाई देवीचे जागृत शक्तिपीठ !



अजिंठा प्रतिनिधी : संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील श्री शिवाई देवीचे शक्तिपीठ साडेतीनशे वर्षांची धार्मिक परंपरा जपत भक्ती आणि श्रद्धेचे केंद्र बनले आहे. अजिंठ्यापासून सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या या मंदिरात नवरात्रोत्सवात भाविकांची मोठी गर्दी होते. देवीचा जयघोष, सनई-चौघड्यांचा निनाद आणि काकड आरतीने परिसर भक्तिमय होतो. स्थानिक आख्यायिकेनुसार, शहादरी वस्तीवरील शिवा नावाचा गवळी दूध-दही विकण्यासाठी शिवना येथे येत असे. संततीप्राप्तीसाठी तो खोलेश्वर महादेवाची आराधना करीत असे. त्याला कन्यारत्न प्राप्त झाले आणि तिचे नाव शिवाई ठेवण्यात आले. एके दिवशी मंदिरात थांबलेल्या शिवाईने वडिलांनी मागे वळून पाहताच अंतर्धान घेतले. त्या ठिकाणी पुढे देवीचे मंदिर उभारण्यात आले, अशी श्रद्धा आहे. शिवाई देवीच्या नावावरून गावाला शिवना हे नाव पडल्याचीही आख्यायिका प्रचलित आहे. या प्राचीन तीर्थक्षेत्रामुळे परिसरातील भाविकांच्या मनात श्रद्धेचे विशेष स्थान निर्माण झाले आहे.

श्री क्षेत्र भोगाव देवी येथे नवरात्रोत्सवानिमित्त पहाटे महापूजा



जिंतूर : तालुक्यातील जिंतूरपासून १३ किलोमीटर अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र भोगाव देवी येथे नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज पहाटे ५ वाजता महाअभिषेक, त्यानंतर महाआरती, देवीपाठ आदी धार्मिक विधी पार पडत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आजच्या महापूजेचा मान भोगाव देवी येथील रवी देशमुख सर, जिंतूर येथील आकाश रामपूरकर, सचिन चिद्रवार, अग्रवाल आदी यजमानांना मिळाला. त्यांच्या हस्ते विधिवत महापूजा करण्यात आली.

मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार गुलाबचंद राठी, उपाध्यक्ष भगवानराव देशमुख, सचिव प्रल्हादराव देशमुख, सहसचिव नामदेवराव शेवाळे, कोषाध्यक्ष प्रमोद पांडे तसेच विश्वस्त मंडळातील सुभाषचंद्र तिवारी व विठ्ठल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.

भाविकांसाठी अन्नछत्राची सुविधा

नवरात्रोत्सव काळात जगदंबा अन्नछत्र मंडळाच्या वतीने दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात येत आहे. श्री क्षेत्र भोगाव देवी येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी या प्रसाद सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भोकरदन पोलीस स्टेशन हद्दीतील धींगाना घालणाऱ्या इसमास माणुसकी ग्रुप ने केले उपचारासाठी पुण्यात दाखल

सदर रुग्ण हा हिंसक वृत्ती चा होता पोलीसांच्या तत्परतेने त्यास रात्री उशिरापर्यंत ताब्यात घेतले

अजिंठा प्रतिनिधी : दानापुर गावातील सदर इसम हा व्यसनाधीन झाला होता त्यामुळे तो पैसे भेटत नाही म्हणून आई वडीलांना मारहाण करने गावातील नागरिकांना शिविगाळ करने जोरजोरात ओरडने रात्र भर फिरत राहणे काल त्याने भर चौकात वडीलांना मारहाण केली होती अश्या तक्रारी वारंवार येत असल्याने भोकरदन पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी संतोष माने सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी मनोरुग्णासाठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुमित पंडित यांना सदर इसमाची माहिती दिली असता त्यास सुमित पंडित यांना पोलिसांच्या मदतीने रात्री उशिरापर्यंत दानापुर गावात जावुन ताब्यात घेतले तो खुप हिंसक वृत्तीचा असल्याने त्यांच्या जवळ हि कोणी जात नव्हते आई वडिल त्यांच्या अश्या वागण्याने कुठे हि नातेवाईकांचा सहारा घेत होते अशी माहिती गल्लीतील नागरिकांनी दिली त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे हजर केले असता त्यांच्या पुढील उपचारासाठी पोलीस स्टेशन भोकरदन येथुन कागदोपत्री पुर्तता



करुन त्यास प्रथमोपचारासाठी शासकीय रुग्णालय घाटी येथे दाखल केले डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यास पुढील उपचार कामे प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा येथे नेण्याचा सल्ला दिल्याने त्यास उपचार कमी पुण्यात दाखल केले आहे.यात भोकरदन पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी संतोष माने सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली

पो.हे.का.संदिप भुतेकर,सोमनाथ मंडलीक, व अँबुलंस 108 डि.एम.अतुल मुरुडकर,ए डि.एम.जालींदर जाधव,डॉ.प्रमोद त्रीभवन,पायलट नितीन लाडगे आदिनी मदतकार्य केले.

माणुसकी समुहाचे कार्य मनोरुग्णानसाठि लाख मोलाचे

मनोरुग्णांच्या जवळ देखील कोणी जायला तयार होत.हे आम्ही स्वतःअनुभवले नाही ते खूप सेन्सिटिव्ह असतात कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात परंतु समाजसेवक सुमित पंडित करत असलेल्या रंजल्या गांजल्यांच्या सेवा ही खरंच वाखाडणे योग्य आहे.

मनोरुग्णानसाठि ते स्वतःदाढी कटिंग व स्वच्छ अघोळ घालुन त्यांना माणसात आणतात व त्यांना हक्काचा निवारा मिळवून देतात आज प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी त्यांना या मनोरुग्णाच्या कोणी जवळही जाण्याची हिंमत करत नव्हते त्याप्रसंगी समाजसेवक सुमित पंडित यांनी मोठे हिमतीने त्या कायदेशीर प्रक्रीया करुन आतापर्यंत 1009 मनोरुग्णांना उपचारासाठी पुणे येथे दाखल केले आहे.पोलीसांना सुमित पंडित हे रात्री बेरात्री फोन केला की नि स्वार्थ भावनेने मदतीसाठी तयार असतात त्यांची पोलीसांना वेळोवळी मदत होत आहे.त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार समाजात अशी खूप कमी लोक आहेत की ते दुसऱ्यासाठी जगत असल्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भोकरदन पोलीस स्टेशन संतोष माने यांनी म्हटले आहे.

ट्रॉन्टेकचा बॅटरी एनर्जी स्टोरेज क्षेत्रात विस्तार

नवी दिल्ली : भारतीय बॅटरी आणि ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनी ट्रॉन्टेक इलेक्ट्रॉनिक्सने बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम क्षेत्रात विस्तार करण्याची घोषणा केली आहे. भारतातील वाढत्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी देशांतर्गत विकसित आणि उत्पादित ऊर्जा साठवणूक प्रणाली तयार करणार आहे. कंपनीने २०२८ पर्यंत १२ GWh बॅटरी उत्पादन क्षमता उभारण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवले आहे. ट्रॉन्टेकच्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम पोर्टफोलिओमध्ये घरगुती वापरापासून ते व्यावसायिक, औद्योगिक आणि युटिलिटी-स्तरीय ऊर्जा साठवणुकीपर्यंत विविध उपायांचा समावेश असेल. इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि बॅटरी तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे ट्रॉन्टेक आता व्यापक ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात आपला व्यवसाय विस्तारत आहे. बॅटरी प्रणाली, ऊर्जा साठवणूक आणि चार्जिंग सोल्यूशन्स या क्षेत्रांमध्ये क्षमता वाढवण्यावर कंपनीचा भर आहे.

पन्नासहून अधिक फुलपाखरांच्या रंगीबेरंगी दुनियेत जरंडीचे हुतात्मा स्मारक बहरले

प्रत्येक फुलपाखराचे विशिष्ट झाडाशी नाते हुतात्मा स्मारकात फुलपाखरांच्या संवर्धनाचा यशस्वी प्रयोग

फर्दापूर प्रतिनिधी : फर्दापूर जवळ जरंडी ता. सोयगाव येथील हुतात्मा स्मारकात ग्रामपंचायतीने जोपासलेल्या समृद्ध वनसंपदा आणि जैवविविधतेमुळे सध्या फुलपाखरांचा हंगाम मोठ्या प्रमाणावर बहरला आहे या परिसरात आतापर्यंत ५० हून अधिक फुलपाखरांच्या प्रजातींची नोंद झाली असून या रंगीबेरंगी जीवसृष्टीकडे नागरिक विद्यार्थी आणि निसर्गप्रेमींचे लक्ष वेधले जात आहे यातून फुलपाखरांचे सौंदर्यच नव्हे तर त्यांच्या संवर्धनासाठी पोषक वनस्पतींचे Host Plants असलेले महत्त्वही अधोरेखित होत आहे

पोषक वनस्पतींचे Host Plants महत्त्व

फुलपाखरू कोणत्याही झाडावर अंडी घालत नाही अंड्यातून बाहेर पडणाऱ्या अळीला कोणत्या वनस्पतीची पाने खाता येतील यावरून मादी फुलपाखरू अंडी घालण्यासाठी विशिष्ट वनस्पतीची निवड करते याला पोषक वनस्पती म्हणतात हुतात्मा स्मारकात विविध वनस्पतींची घनदाट लागवड करण्यात आली आहे

लिंबू कढीपत्ता बेल यावर लाइम बटरफ्लाय कॉमन मॉर्मन आणि राज्याचे मानकरी ब्लू मॉर्मन आढळतात

रुई मंदार या वनस्पती स्ट्राइप टायगर ब्लू टायगर आणि कॉमन क्रो प्रजातींसाठी महत्त्वाच्या आहेत

एरंडी सीताफळ यावर कॉमन कॅस्टर तर कडुलिंब व करंजावर कॉमन सेरुलियन आढळते



पिंपळ वड उंबर या झाडांशी कॉमन लिओपार्ड यलो पॅन्सी आदी प्रजातींचे नाते आहे

अळी पानांवर तर फुलपाखरू मधुरसावर

फुलपाखराच्या जीवनातील अळी आणि प्रौढ या दोन्ही अवस्थांमध्ये आहाराची पद्धत वेगळी असते अळीला जबडा असल्याने ती पानांवर जगते तर प्रौढ फुलपाखराला लांब नळीप्रमाणे प्रोबॉसिस असते ज्याद्वारे ते फुलांमधील मधुरस शोषते तसेच स्मारकातील संगीत कारंजे आणि नदीच्या ओलसर काठावर फुलपाखरे चिखलातून क्षारयुक्त पाणी आणि खनिजे घेताना दिसतात

ऋतूनुसार फुलपाखरांची विविधता

पावसाळा जून ते सप्टेंबर सर्वाधिक विविधतेचा काळ ब्लू मॉर्मन कॉमन मॉर्मन टायगर गट मोठ्या संख्येने आढळतात

हिवाळा ऑक्टोबर ते फेब्रुवारी फुलपाखरे पाहण्यासाठी उत्तम काळ पेंटेड लेडी 'कॉमन इमिग्रंट आणि 'लाइम बटरफ्लाय मोठ्या प्रमाणावर दिसतात

उन्हाळा मार्च ते मे यलो पॅन्सी लेमन पॅन्सी यांसारख्या उष्णता सहन करणाऱ्या प्रजाती पाणवठ्यांच्या परिसरात दिसतात

असे असते फुलपाखराचे जीवनचक्र

फुलपाखराचे जीवन अंडी अळी कोष आणि प्रौढ फुलपाखरू अशा चार टप्प्यांतून जाते साधारण ३-५ दिवसांत अंडी उबतात त्यानंतर १५-२० दिवस अळी अवस्था १०-१५ दिवस कोषावस्था असते आणि शेवटी रंगीबेरंगी फुलपाखरू बाहेर पडते छोट्या प्रजातींचे आयुष्य १ ते २ आठवडे तर मोठ्या प्रजातींचे आयुष्य ३ ते ४ आठवड्यांचे असते

शाळा अंगणवाडी घराची परसबाग तसेच शेताच्या बांधावर अशा विशिष्ट वनस्पती लावल्यास छोटी छोटी 'बटरफ्लाय गार्डन' सहज तयार होऊ शकतात असा संदेश यातून दिला जात आहे

जरंडी येथील ग्रामपंचायतीने लागवड केलेल्या समृद्ध वनसंपदा आणि जैवविविधतेमुळे 'बटरफ्लाय टुरिझम'ला चालना मिळत आहे हुतात्मा स्मारकात फुलपाखरांचे निरीक्षण करण्यासाठी निसर्गप्रेमी पर्यटक मोठ्या संख्येने आकर्षित होत असून यातून स्थानिक युवकांना निसर्ग मार्गदर्शक Nature Guide म्हणून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत

सोयगाव तालुक्यातील गलवाडा येथे ज्योतीचे स्वागत; पहिल्या माळेला दुर्गादेवीची घटस्थापना



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.१२ ऑक्टोबर

सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ) येथे नवरात्रोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही नाशिक जिल्ह्यातील वणी येथील सप्तशृंगी गडावरून पवित्र ज्योत आणण्याची परंपरा जपण्यात येत आहे. गावातील युवक श्रद्धा आणि भक्तिभावाने ज्योत आणण्यासाठी वणीच्या गडावर जातात. ही ज्योत घेऊन युवक सोयगावमार्गे गलवाडा येथे दाखल होताच गावातील भाविक भक्त आणि नागरिकांकडून ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत स्वागत केले जाते.

पहिल्या माळेला ज्योत गावात आणल्यानंतर दुर्गादेवीची घटस्थापना करण्यात येते.या परंपरेमुळे गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण भक्तिमय होते. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने गावातील युवकांचा उत्साह आणि भाविकांची श्रद्धा यांचे दर्शन घडते.

ज्योत आणणारे युवक

सतीश लवटे, संतोष औरंगे, गोपाल चक्के, देवा सुरडकर, प्रथमेश निकम, हिमाल इंगळे, विजय सोनवणे, सुनील इंगळे, शिवा जाधव, हर्षल इंगळे, प्रेम इंगळे, राहुल तायडे, गुरमीत निकाळजे, हार्दिक बिरारे, जय बावस्कर, संतोष इंगळे, नरेंद्र इंगळे, गोरख कल्याणकर, परमेश्वर लवटे, प्रवीण जोहरे, आकाश गायकवाड, रितेश मंडवे, दीपक सोनवणे, संदीप माजाटे आणि सौरव सोनवणे या युवकांचा ज्योत आणण्यात सहभाग असतो.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

कन्नडमध्ये चारित्र्यावरील संशयातून पत्नीची हत्या

कन्नड - दि.१२ ऑक्टोबर - शहरातील गजानन कॉलनीत पत्नीच्या हत्येची धक्कादायक घटना १२ ऑक्टोबर रोजी पहाटे उघडकीस आली. रोहिणी मुकेश कुंभकर्ण (वय ४४) असे मृत महिलेचे नाव असून, तिच्या पतीने चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी पती मुकेश बाळकृष्ण कुंभकर्ण याच्याविरुद्ध कन्नड शहर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहिणी आणि मुकेश यांचा विवाह २००३ मध्ये झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. सुरुवातीला संसार सुरळीत सुरू असताना मागील सहा ते सात महिन्यांपासून पती-पत्नीमध्ये



वाद होत असल्याचे फिर्यादी रवींद्र रामदास घडमोडे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

पती आपल्यावर संशय घेत असल्याने त्याच्यासोबत राहणे कठीण होत असल्याचे रोहिणी हिने माहेरच्या मंडळींना फोनवरून सांगितल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. काही महिन्यांपूर्वी हे दाम्पत्य छत्रपती संभाजीनगर येथे भाड्याच्या खोलीत राहायला गेले होते. तेथेही त्यांच्यात वाद होत असल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. ७ ऑक्टोबर रोजी दोघे पुन्हा कन्नडला परतले होते. १२ ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास रोहिणी हिच्या डोक्यात व तोंडावर लाकडी दांडक्याने वार करून तिला मारहाण करण्यात आली,मारहाणीत रोहिणी या जागीच गतप्राण झाल्या.घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी रवींद्र रामदास घमघांडे यांच्या फिर्यादीवरून मुकेश बाळकृष्ण कुंभकर्ण याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश दिंडे हे करत आहे.

राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष निखिल ठाकरे यांची मा जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांच्या ऑफिसला भेट

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष निखिलदादा ठाकरे हे पक्ष संघटनेच्या कामानिमित्त हिंगोली जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोलीचे माजी जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांच्या संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसह विविध राजकीय व सामाजिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या भेटीदरम्यान हिंगोली जिल्ह्यातील पक्ष संघटनेची सद्यस्थिती, पदाधिकारी व



कार्यकर्त्यांचे कार्य तसेच आगामी काळात संघटना अधिक बळकट करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर विचारविनिमय करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक प्रदेशाध्यक्ष पदी निखिल ठाकरे यांची निवड झाल्याबद्दल व हिंगोली जिल्ह्यात सर्वप्रथम आल्याबद्दल त्याचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी त्याच्यासोबत युवक प्रदेश सरचिटणीस अमर पाटील यांची उपस्थिती होती या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेश सचिव श्री. सुजय देशमुख, युवक प्रदेश उपाध्यक्ष बालाजी घुगे, युवक जिल्हा उपाध्यक्ष श्री. बालाजी जाधव, विलास आघाव वैभव बांगर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या सदिच्छा भेटीमुळे जिल्ह्यातील पक्ष संघटनेच्या कामकाजाबाबत चर्चा करण्याची संधी मिळाली. तसेच जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक प्रश्नांवर विचारांची देवाणघेवाण झाली.

मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी सूक्ष्म निरीक्षकांनी दक्ष राहावे - जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी सूक्ष्म निरीक्षकांचे पहिले प्रशिक्षण संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी:

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सूक्ष्म निरीक्षकांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. मतदान केंद्रावरील प्रत्येक घडामोडीचे बारकाईने निरीक्षण करून निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

पदवीधरमतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांचे पहिले प्रशिक्षण आज सोमवार (दि.१२) रोजी जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी उपस्थित होते. या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी सूक्ष्म निरीक्षकांची भूमिका, जबाबदाऱ्या, निवडणूक प्रक्रियेतील विविध बारकावे आणि मतदानाच्या वेळी घ्यावयाची दक्षता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी निवडणूक प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, विहित कार्यपद्धती तसेच मतदान प्रक्रियेच्या निरीक्षणादरम्यान करावयाच्या कार्यवाहीची माहिती दिली.

* अनुपस्थित राहणाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा*

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी नियुक्त सूक्ष्म निरीक्षकांनी त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे. मतदान केंद्रावरील घडामोडींचे बारकाईने निरीक्षण करून विहित सूचनांचे पालन करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

दरम्यान, प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. संबंधितांकडून प्राप्त होणारा खुलासा असमाधानकारक असल्यास नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

निवडणुकीसाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहून निवडणूकविषयक सूचना आणि कार्यपद्धतींची माहिती घेणे आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

पार्टीचा हट्ट : तरुणाच्या छातीत, डोळ्यात चाकूचे वार

मित्राला पार्टी देण्यास नकार दिल्याने वाद; चौघांनी मिळून केला हल्ला

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मित्राला पार्टी देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून एका १८ वर्षीय तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना हर्सूल परिसरात घडली. एकता कॉलनीतील सानिया मेडिकलजवळ सुरू झालेला वाद पुढे टोकाला गेला. आरोपीने तरुणाच्या छातीत चाकू खुपसला. त्यानंतर इतर तीन साथीदारांसह त्याला रेल्वे स्टेशन परिसरातील हमालवाड्यातील मोकळ्या मैदानावर नेऊन उजव्या डोळ्यासह शरीराच्या विविध भागांवर चाकूने वार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी हर्सूल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून एका विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. पार्टी देण्याच्या कारणावरून त्याच्याशी वाद घातला. फैजानने पार्टी देण्यास नकार दिल्याने विधिसंघर्षग्रस्त बालकाने त्याला शिवीगाळ केली. तसेच, पार्टी दिली नाही तर संपवून टाकण्याची धमकी देत त्याच्या छातीत चाकूने वार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

हल्ल्यानंतर फैजानला घाटी रुग्णालयात घेऊन जात असल्याचे सांगून अन्य तीन साथीदारांसह त्याला मोटारसायकलवर बसवले. मात्र, त्याला रुग्णालयात नेण्याऐवजी रेल्वे स्टेशनजवळील हमालवाड्यातील मोकळ्या मैदानावर नेण्यात आले. तेथे चौघांनी मिळून फैजानवर पुन्हा हल्ला केला. त्याच्या उजव्या डोळ्यात, पाठीवर आणि हातावर चाकूने वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी सय्यद इम्रान सय्यद गफूर यांच्या फिर्यादीवरून हर्सूल पोलिस ठाण्यात गुन्हा भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ३(५) तसेच शस्त्र अधिनियमाच्या कलम ४ व २५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, अन्य तीन अनोळखी आरोपींची नावे व पत्ते अद्याप समोर आलेले नाहीत. पोलिस निरीक्षकांच्या आदेशानुसार या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सदाफुले यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची 1 नोव्हेंबरपासून राज्यव्यापी आरोग्य संवाद यात्रा

10 लाख आरोग्य समिती सदस्य, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांशी साधणार संवाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकाराने १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरदरम्यान राज्यव्यापी 'आरोग्य संवाद यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेद्वारे राज्यातील सुमारे १० लाख आरोग्य समिती सदस्य, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांशी थेट संवाद साधून आरोग्य सुविधांबाबत अभिप्राय व सूचना जाणून घेतल्या जाणार आहेत.

या यात्रेत सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त, संचालकांसह विविध स्तरांवरील अधिकारी सहभागी होणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दोन ग्रामीण रुग्णालयांना आरोग्यमंत्री अचानक भेट देऊन कामकाजाचा आढावा घेणार आहेत. तसेच उपकेंद्रांपासून जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, मनोरुग्णालये आणि महापालिका रुग्णालयांपर्यंतच्या आरोग्य संस्थांच्या कामकाजाची पाहणी केली जाणार आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आरोग्य समित्यांच्या बैठका घेऊन आरोग्य सेवांमधील अडचणी, सुविधांची उपलब्धता आणि सुधारणांसाठीच्या सूचना जाणून घेतल्या जातील. खासगी वैद्यकीय व्यावसायिकांशीही संवाद साधण्यात येणार आहे. यात्रेनंतर ५ डिसेंबरनंतर राज्यस्तरीय बैठक घेऊन प्राप्त सूचनांवर चर्चा केली जाणार आहे. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबईत आरोग्य समिती सदस्यांची बैठकही आयोजित करण्यात येणार आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, मोफत डायलिसिस, एमआरआय, सीटी स्कॅन, रक्त तपासण्या, रुग्णवाहिका सेवा आणि जननी सुरक्षा योजनेसह विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे. तसेच स्वच्छता, शुद्ध पाणी, पोषण, रोगप्रतिबंधक उपाय आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती केली जाणार आहे.

अभिनेता राज चव्हाण यांचा 'क्रिएट युवर स्टोरी'मधून विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेचा संदेश

एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रेरणादायी कार्यक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : स्वतःच्या आयुष्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत आपल्या विचारांत, दृष्टिकोनात आणि कृतीत बदल घडवा. स्वतःच्या आयुष्याचे मुख्य पात्र स्वतःच बना आणि स्वतःची कथा स्वतः लिहा, असा संदेश अभिनेता राज चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना दिला.

महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे आर्यभट्ट सभागृहात आयोजित 'क्रिएट युवर स्टोरी' या प्रेरणादायी कार्यक्रमात ते बोलत होते. राज चव्हाण हे एमजीएम विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक



विज्ञान अभियांत्रिकी शाखेच्या २००९ च्या तुकडीचे माजी विद्यार्थी आहेत.

प्रत्येक व्यक्तीमध्ये सर्जनशीलता असते आणि स्वतःच्या आयुष्याची कथा घडविण्याची क्षमता असते, असे राज चव्हाण यांनी सांगितले. आयुष्य जगताना केवळ यंत्रवत वागण्याऐवजी थोडे थांबून विचार करणे, स्वतःला प्रश्न विचारणे आणि नवीन काय निर्माण करता येईल, याचा शोध घेणे आवश्यक आहे. आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला आपण कसा प्रतिसाद देतो, यावर आपल्या अनुभवांची आणि पुढील वाटचालीची दिशा ठरते. कोणताही प्रतिसाद परिपूर्ण नसला, तरी प्रत्येक अनुभवातून शिकून नव्या पद्धतीने प्रतिसाद देता येतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्वतःला नव्याने घडविण्याचा संदेश

'रि-क्रिएट, रि-कॅलिब्रेट अँड रिक्रिएट' या संकल्पनेतून स्वतःला वेळोवेळी नव्याने घडविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. आपल्या विचारसरणीत आणि दृष्टिकोनात बदल घडवून आणल्यास आयुष्याला नवी दिशा देता येते, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका प्रा. डॉ. परमिंदर कौर, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थिनी गाझी हानिया हिने सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. समीर शेख आणि प्रा. स्नेहल रत्नपारखी यांनी योगदान दिले.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात भूगोल मंडळाची स्थापना; 'अल निनोचा प्रभाव व महाराष्ट्रातील जलसंकट' विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१२ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील भूगोल विभागाच्या वतीने भूगोल मंडळाची स्थापना आणि 'अल निनोचा प्रभाव, महाराष्ट्रातील जलसंकट व त्यावरील उपाययोजना' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात किसान महाविद्यालय, पारोळा येथील भूगोल विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रफुल्ल ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. यावेळी भूगोल विभागप्रमुख डॉ. छत्रगुन भोरे, डॉ. पंकज शिंदे तसेच मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रमेश औताडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. प्रफुल्ल ठाकरे यांच्या हस्ते भूगोल मंडळाची स्थापना करण्यात आली. भूगोल विषयाविषयी विद्यार्थ्यांमध्ये



आवड निर्माण करणे, भौगोलिक घटनांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे तसेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करणे, हा भूगोल मंडळाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे.

याप्रसंगी प्रा. डॉ. प्रफुल्ल ठाकरे यांनी 'अल निनोचा प्रभाव, महाराष्ट्रातील जलसंकट व त्यावरील उपाययोजना' या विषयावर सविस्तर विवेचन केले. अल निनो ही प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय भागातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात होणाऱ्या बदलांशी संबंधित हवामानविषयक घटना असून, तिचा जागतिक हवामानावर परिणाम होतो. भारतातील मान्सूनच्या पर्जन्यमानावरही तिचा प्रभाव पडू शकतो. महाराष्ट्रातील पावसाचे अनिश्चित स्वरूप, दुष्काळी परिस्थिती, भूजल पातळीतील घट आणि पाण्याची वाढती मागणी यांमुळे निर्माण होणाऱ्या जलसंकटावर त्यांनी प्रकाश टाकला.

जलसंकटावर मात करण्यासाठी पाणी अडवा, पाणी जिरवा, जलसंधारण, शेततळी, वृक्षारोपण, पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पुनर्भरण आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. जलव्यवस्थापनामध्ये लोकसहभागाचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाबाबत समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी भूगोल विषयाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना पर्यावरण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन प्राप्त होतो, असे सांगितले. अशा व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना समकालीन प्रश्नांची जाणीव होते आणि त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडते, असेही त्यांनी नमूद केले.

भूगोल मंडळाच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार असून, भूगोल विषयाच्या अध्ययनाला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि भूगोल विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. भूगोल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन आणि हवामान बदलांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते राज्यस्तरीय तांग सु डो कोरियन कराटे स्पर्धेतील विजयी विद्यार्थींचे स्वागत

8 सुवर्ण, 9 रौप्य आणि 6 कांस्य पदकांची दमदार कामगिरी!

बिडकीन दि १० ऑक्टोबर नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय तांग सु डो स्पर्धेत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते राज्यस्तरीय तांग सु डो, कोरियन कराटे स्पर्धेमध्ये विजयी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, व पुढील दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या -राज्यस्तरीय तांग सु डो कोरियन कराटे स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची २३ पदकांची कमाई!८ सुवर्ण, ९ रौप्य आणि ६ कांस्य पदकांची दमदार कामगिरी!

दि २६'ते २७ सप्टेंबर रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांग सु डो - राज्य स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या खेळाडूंनी एकूण २३पदकांची कमाई करून जिल्ह्याचा गौरव वाढविला.या स्पर्धेचे आयोजन तांग सु डो स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मुंबई येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत - डिस्टिक अँड सिटी तांग सु डो स्पोर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगर या संघटनेच्या खेळाडूंनी फुमसे व स्पायरिंग या प्रकारांत विविध वयोगट व वजन गटांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत पदके जिंकली.विजयी विद्यार्थ्यांची नावे धनश्री वाघ, अर्णवी जंगले, नक्षा नेहते, सानिका पागोरे, शाश्वती सांबारे, गौरी चित्राक, भाग्यश्री राऊत, आरोही हलकुडे, युक्ता शिशोदे, नेहा श्राप,सलोनी तायडे, विराज चव्हाण, कार्तिक कुलकर्णी,राजवीर घुगे, अनुज मिस्त्री स्वरित जाधव, सविनय तायडे,या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे डिस्टिक अँड सिटी तांग



सु डो स्पोर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगरचे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मास्टर पवन घुगे सचिव व मुख्य प्रशिक्षक मास्टर प्रविण घुगे उपाध्यक्ष - अनुप बोराळकर सहसचिव - कुणाल पाटील,महिला प्रशिक्षिका नंदा घुगे ,राधा घुगे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले आहेत. तसेच संघटनेचे अध्यक्ष पवन घुगे सचिव प्रविण घुगे , पालकमंत्री पंकजाताई मुंडे व पर्व कंट्रक्शन चे अध्यक्ष अभिषेक बडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व हार्दिक शुभेच्छा दिल्या प्रशिक्षिका नंदा घुगे, राधा घुगे, प्रशिक्षक शाम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे, ऋतुजा रणवळकर,धनश्री सिदवाडकर,मंगल कवडे व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911